# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

## विभागीय कार्यालय,पुणे

(स्वायत्त) (ISO 9001:2015) (ISO/IEC 27001:2013)

४१२/डी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय इमारत, पहिला मजला, शिवाजीनगर, पुणे-१६

दूरध्वनी क्र.:(०२०)२५६५६९९४ फॅक्स क्र.: (०२०)२५६५२३०८

Email : rbtepn@msbte.com Web: www.msbte.org.in


जा क्रं. मातंशिमं/विकापु/विवि/उ.प.२०२२/ज्यादा तास/२०२२/392 दि. - 6 MAY 2022

प्रति,
पुणे विभागातील सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था,

**विषय** - संस्थेतील द्विव्यांग परीक्षार्थीकरीता **उन्हाळी परीक्षा २०२२** करीता परीक्षेसाठी वेळ वाढवून मिळणेबाबत.

**संदर्भ** - १) शासन निर्णय क्रं संकिर्ण -२०१६/पत्र क्रं ३०२/विशि-३/दि.०४/०३/२०१७.
२) श्री ए एम दंडवते, सहा. सचिव (तां.) यांचा दिनांक ०६/०५/२०२२ रोजीचा ईमेल.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मार्फत पदविका परीक्षा घेतल्या जातात. परीक्षा कालावधीत या कार्यालयास संस्थेतील द्विव्यांग परीक्षार्थीकरीता मंडळाच्या परीक्षा नियमावली नियम क्रं. RG-१०(G) प्रमाणे परीक्षेसाठी वेळ वाढवून दिली जाते. सदरचे परिक्षार्थीचे अर्ज या विभागीय कार्यालयास सादर करताना संस्थेच्या प्राचार्यांनी संबंधित विदयार्थ्याचा प्रवेश द्विव्यांग राखीव जागेतून झाला किंवा कसे? याबाबतचा स्पष्ट उल्लेख पत्रात करणे आवश्यक आहे. तसेच, संबंधित विदयार्थी नमुद केलेल्या नियमाप्रमाणे पात्र असल्यास या कार्यालयाकडे शिफारस करण्यात यावी. परीक्षेसाठी संदर्भिय पत्रामधील तरतुदींचे नियोजन करणे आवश्यक आहे. सदर द्विव्यांग परिक्षार्थींची माहिती खालील दिलेल्या तक्त्यात संस्था प्रमुखांची सही व शिक्कयासह **दि. १०/०५/२०२२ सायंकाळ ०५.०० वाजेपर्यंत ईमेलद्वारे (rbtepn@msbte.com) व मुळ प्रत दि. १२/०५/२०२२ पर्यंत संस्थेच्या प्रतिनिधीमार्फत खालील दिलेल्या कागदपत्रांसह या कार्यालयास सादर करावीत**

| Sr. No. | Instt. Code | Instt. Name | Enrollment No. | Student Name | Course Code | Disability Type | Request Extra Time |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**सोबत मुळ कागदपत्रे व छायांकित प्रतीसहीत खालील प्रमाणे सादर करावीत.**

१. संबंधित विदयार्थ्यांचा अर्ज.
२. संबंधित विदयार्थ्यांचे ४० पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्राची छायांकित प्रत.
३. विदयार्थ्याचा नोंदणी क्रमांक (Enrollment) सत्र (Semester) उदा. CE4G

उपरोक्त अर्ज दि. १२/०५/२०२२ पर्यंतच या कार्यालयास प्राप्त होणे गरजेचे आहे. तसेच संस्थेच्या पत्रात संस्था प्रमुखांचा व सदर विषय हाताळणा-या लिपिकाचा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी (Mobile No. & E-mail ID) नमूद करणे अपरिहार्य आहे.

06/05/2022

**(शाहीद उस्मानी)**
उपसचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय, पुणे -१६

**टिप - अपवादात्मक परिस्थितीत जसे एखादया विदयार्थ्याचा अचानक अपघात झाला किंवा नैसर्गिक दुर्घटना परिक्षार्थीच्या बाबतीत घडली तरच अशा अर्जाचा विचार करण्यात येईल.**